MHNS160012682021

**<u>नियमीत दिवाणी दावा क्र. १०८/२०२१ मध्ये निशाणी ७३ खाली आदेश</u>**

**प्रकाश हिरे वि. रंजनाबाई हिरे**

१. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. ५ ने त्यांच्याविरुद्ध झालेला विनाकैफियत दावा चालवण्याचा आदेश बाजूला सारण्यासाठी दिलेला आहे. प्रतिवादी क्र. ५ ने त्यांच्या अर्जात नमुद केले आहे की, वादीने सदरचा दावा खरेदीखत करुन मिळण्यासाठी व निरंतरच्या ताकिदीसाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्याचे समन्स प्रतिवादी क्र. ५ ला दि.२३.०१.२०२४ रोजी मिळाले. मात्र कैफियत देण्यासाठी आवश्यक ती कागदपत्रे प्रतिवादी क्र. ५ ला मिळाली नाहीत. तसेच प्रतिवादी क्र. ५ वयस्कर असल्यामुळे देखील त्यांना आवश्यक ती माहिती वेळेत वकीलांना देऊन त्यांची कैफियत व म्हणणे देता आले नाही व त्यामुळे त्यांच्याविरुद्ध दि.०८.१०.२०२४ रोजी विनाकैफियत व विनाजबाबचा आदेश पारित झालेला आहे. तो बाजूला सारुन प्रतिवादी क्र. ५ ला त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्याची विनंती प्रतिवादी क्र. ५ ने सदर अर्जाद्वारे केलेली आहे.

२. सदर अर्जाला वादींनी त्यांचे म्हणणे दिलेले असून सदर अर्जाला त्यांचा जोरदार आक्षेप नोंदवलेला आहे. प्रतिवादींनी केवळ वादींना त्यांच्या न्याय हक्कापासून वंचित ठेवण्यासाठी मुदतीमध्ये त्यांची कैफियत व म्हणणे दिले नाही. त्यामुळे सदरचा अर्ज कायद्याने चालण्यास पात्र नसल्यामुळे तो नामंजूर करण्याची विंनती वादीच्या विधिज्ञांनी केली.

३. प्रतिवादी क्र. ५ चा अर्ज व त्यावरील वादींचे म्हणणे वाचले. दोन्ही विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. संचिकेच्या अवलोकनानुसार प्रतिवादी क्र. ५ वर

दि.२३.०१.२०२४ रोजी समन्सची बजावणी झाल्याचे दिसून येते. मात्र त्यानंतर देखील प्रतिवादी क्र. ५ ला वारंवार संधी देऊन देखील त्यांनी मुदतीमध्ये त्यांची कैफियत दाखल न केल्यामुळे जवळपास १ वर्ष ९ महिन्या कालावधीनंतर न्यायालयाने प्रतिवादी क्र. ५ विरुद्ध जबाब/कैफियत नाहीचा आदेश पारित केलेला आहे. अर्जात दिलेले कारण अत्यंत मोघम स्वरुपाचे आहे. या प्रतिवादींमुळे सदरचा दावा विनाकारण लांबणीवर पडल्याने प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची विंनती वादीच्या विधिज्ञांनी केली.

४. प्रतिवादी क्र. ५ चा अर्ज व त्यावरील वादींचे म्हणणे वाचले. दोन्ही विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. संचिकेनुसार प्रतिवादी क्र. ५ ला पुरेशी संधी दिल्यानंतरच जवळपास ९ महिन्यानंतर न्यायालयाने प्रतिवादी क्र. ५ विरुद्ध विनाकैफियतचा आदेश दि.०८.१०.२०२४ रोजी पारित केलेला आहे व तो आदेश बाजूला सारण्यासाठी जवळपास २ वर्षांच्या विलंबाने प्रतिवादी क्र. ५ ने सदरचा अर्ज दिल्याचे दिसून येते. ज्यावरुन हे स्पष्टपणे निदर्शनास येते की, प्रतिवादी क्र. ५ मुळे सदर दाव्याचे काम विनाकारण लांबणीवर पडले आहे. झालेल्या विलंबासाठी प्रतिवादी क्र. ५ ने अत्यंत मोघम स्वरुपाचे कारण दिलेले आहे.

५. तथापि, सदरचा दावा दिवाणी असल्यामुळे प्रतिवादींना त्यांची बाजू मांडण्याची व त्यांची कैफियत दाखल करण्याची परवानगी देणे कायद्यानुसार गरजेचे आहे. मात्र प्रतिवादी क्र. ५ मुळे प्रस्तुतकामी विनाकारण जो विलंब झालेला आहे. त्यासाठी त्यांच्यावर आवश्यक तो दंड बसवणे देखील कायद्यानुसार गरजेचे आहे. सबब, वरील सर्व विवेचनाच्या अनुषंगाने मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## – <u>आदेश</u> –

१. प्रतिवादी क्र. ५ चा अर्ज त्याने वादींना र.रु. ५००/– देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. सदरची दंडाची रक्कम भरल्यानंतर प्रतिवादी क्र. ५ विरुद्ध झालेला विनाकैफियतचा आदेश सेट असाईड होऊल याची प्रतिवादी क्र. ५ ने नोंद घ्यावी.

SUNGARE VRUSHALI DINANATH

Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2026.04.16 19:10:18 +0530

दिनांक :– १६.०४.२०२६
ठिकाण :– चांदवड

(वृषाली दी. सुंगारे)
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
चांदवड.